राज्यातील अपंग व्यक्तींना अपंगत्वाचे फायदे
घेण्यासाठी आवश्यक असलेले अपंगत्वाचे
वैद्यकीय प्रमाणपत्र निर्गमित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन परिपत्रक क्र.अपंग २००९/प्र.क्र.५९/सुधार-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १८ मे, २००९

वाचा:-१)शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ
दिनांक ६-५-२००४
२)आयुक्त अपंग कल्याण यांचे पत्र क्र.अपकआ/प्र.क्र.९/वेतनश्रेणी/देशमुख/२००८-०९/३१
दिनांक ९-४-२००९

**परिपत्रक**

राज्यातील अपंग व्यक्तींना राज्य शासनाच्या सोयी सवलतींचा लाभ घेण्यासाठी व अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग ) अधिनियम १९९५ अन्वये अपंगत्वाचे लाभ घेण्यासाठी महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी दिनांक ३०-८-२००४ अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अध्यक्षतेखाली वैद्यकीय मंडळाची नियुक्ती करुन सदर मंडळाला अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्यासाठी वैद्यकीय प्राधिकारी घोषित केले आहे.

२. जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिलेले अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र हे सर्व शासकीय सोयी सवलतीसाठी ग्राह्य असून सदर प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिलेले अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्राची पडताळणी करण्याचा आग्रह कोणत्याही प्राधिकाऱ्याने धरु नये. मात्र अपंग उमेदवारांना सेवेत नियुक्ती देण्यापूर्वी शासनाने नियुक्त केलेल्या तज्ञ वैद्यकीय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच त्याची नियुक्ती करावी. थोडक्यात संबंधित उमेदवाराची शारिरीक तपासणी करणे अनिवार्य राहील. तथापि वैद्यकीय प्रमाणपत्राची पडताळणी करणे अभिप्रेत नाही.

३. शंकास्पद प्रकरणी अथवा प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सकांनी निर्गमित केलेले आहे किंवा कसे, याबाबतची शहानिशा करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( एन. आरोग्यम )
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
सर्व आयुक्त, महानगरपालिका
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक अधिकारी
निवड नस्ती का.सुधार-३